**<u>ठळक बातम्या</u>**

- बियाणे उत्पादन क्षेत्रातल्या खासगी कंपन्यांनी संशोधन आणि विकासाला प्राधान्य द्यावं, असं केंद्रीय कृषीमंत्र्याचं आवाहन

- जम्मू काश्मीरमधे दहशतवादी कारवायांचं प्रमाण लक्षणीयरीत्या घटलं असल्याचं लष्करप्रमुख उपेंद्र द्विवेदी यांचं प्रतिपादन

- दिल्ली कारस्फोट प्रकरणी आमीर राशीद याला १० दिवसांची एनआयए कोठडी

- बिहारमधे मंत्रिमंडळ बरखास्ती आणि मुख्यमंत्र्यांच्या राजीनाम्यानंतर नवीन सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा

**आणि**

- सौदी अरेबियात उमरा यात्रेसाठी गेलेल्या किमान ४० भारतीयांचा बस अपघातात मृत्यू

**<><><><><>**

कृषी उत्पादनाच्या सरसरीत वाढ करून शेतकऱ्यांचं हित साधण्यासाठी  बियाणे उत्पादन क्षेत्रात बियाणे उत्पादक कंपन्यांनी  संशोधन आणि विकासाला प्राधान्य द्यावं, असं आवाहन केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांनी केलं आहे. चौहान यांच्या हस्ते आज मुंबईत आशियाई बीज परिषद २०२५ चं उद्घाटन झालं, त्यावेळी ते बोलत होते. देशभरतल्या बियाण्यांच्या उपलब्धतेची माहिती, बीज प्रमाणीकरण आणि पुरवठा साखळी मजबूत व्हावी यासाठी या कंपन्यांनी ‘साथी’ या पोर्टलवर नावनोंदणी करावी, अशी सूचना त्यांनी दिली. हवामान बदलाचा वाढता परिणाम लक्षात घेऊन सर्व प्रकारच्या हवामानात उत्पादन करण्यायोग्य बियाणांचे वाण विकसित करण्याची गरज असल्याचं त्यांनी सांगितलं. भरड धान्य उत्पादन वाढलं तर भारताची अन्न सुरक्षा मजबूत होईल, असं कृषी मंत्री म्हणाले.

या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील उपस्थित होते.

**<><><><><>**

जम्मू-काश्मीरमधल्या दहशतवादी कारवायांमध्ये लक्षणीय घट झाल्याचा दावा लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी केला आहे. नवी दिल्लीत चाणक्य संरक्षण संवाद २०२५च्या उद्घाटन समारंभात ते बोलत होते. या वर्षी आतापर्यंत ३१ दहशतवादी ठार झाले असून त्यापैकी ६१ टक्के दहशतवादी पाकिस्तानी होते, असंही ते यावेळी म्हणाले.

**- - होल्ड - बाईट - उपेंद्र द्विवेदी - -**

भारत कोणत्याही प्रकारच्या युद्धाला प्रत्युत्तर द्यायला तयार असून जे दहशतवादाचं समर्थन करतील किंवा त्याला पाठिंबा देतील त्यांना योग्य उत्तर दिलं जाईल, असंही द्विवेदी म्हणाले. चाणक्य संरक्षण संवाद २०२५ हा भारतीय लष्कराच्या प्रमुख आंतरराष्ट्रीय संवादाची तिसरी आवृत्ती असून यंदाची या संवादाची संकल्पना ‘परफॉर्म टू ट्रान्सफॉर्म: सशक्त, सुरक्षित आणि विकसित भारत’ ही आहे.

**<><><><><>**

दिल्लीत लाल किल्ल्याजवळ झालेल्या कार बॉम्बस्फोट प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेनं आमीर राशीद अली, या कश्मिरच्या रहिवाशाला दिल्लीत अटक केली.असून त्याला पटियाला हाऊस न्यायालयाने १० दिवसांची एनआयए कोठडी दिली आहे. अमीर यानं, उमर नबी याच्यासोबतीनं स्फोटाचा कट रचला होता, असं तपास यंत्रणेनं म्हटलं आहे. या स्फोटात वापरलेल्या कारची नोंदणीही आमीर याच्या नावावर होती अशी माहिती तपास यंत्रणेनं दिली आहे.

**<><><><><>**

पंजाबचे सिंह म्हणून ओळखले जाणारे थोर स्वातंत्र्यसेनानी लाला लाजपतराय यांच्या पुण्यतिथीनिमित्त देश आज आदरांजली वाहत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, केंद्रीय परिवहन मंत्री नितीन गडकरी, तसंच काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी लाला लाजपतराय यांना आदरांजली वाहिली आहे.

महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही समाजमाध्यमावर लाला लाजपतराय यांना नमन केलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या अध्यक्षतेखाली हरियाणामधे फरिदाबाद इथं एन झेड सी अर्थात उत्तर विभागीय परिषदेची बैठक सुरू आहे. हरियाणा, हिमाचल प्रदेश,

पंजाब, राजस्थान, दिल्ली, जम्मू आणि काश्मीर, लडाख आणि चंडीगड या राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांचा समावेश एन झेड सी मधे होतो. या सर्व राज्यांचे मुख्यमंत्री या बैठकीला उपस्थित आहेत. बैठकीच्या सुरुवातीला दिल्ली स्फोटात मरण पावलेल्यांना आदरांजली वाहण्यात आली. राज्यांमधे परस्पर समन्वय, पाणी प्रश्न आणि विकासकामं या मुद्द्यांवर बैठकीत चर्चा होत आहे.

<><><><>

बिहार विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मिळालेल्या विजयानंतर राज्यात सरकार स्थापनेसाठी राजकीय हालचालींनी वेग घेतला आहे. मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली आज मावळत्या मंत्रिमंडळाची शेवटची बैठक झाली. यात मंत्रिमंडळ बरखास्तीचा प्रस्ताव मंजूर झाला. त्यानंतर मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी राज्यपाल आरिफ मोहम्मद खान यांच्याकडे आज मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यामुळे नव्या सरकारच्या स्थापनेचा मार्ग मो◌ेकळा झाला आहे.

राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या घटक पक्षांच्या बैठकांमध्ये मंत्रिमंडळाची रचना आणि मंत्रिपदांबाबत चर्चा सुरू आहे. आघाडीत भाजपाकडे सर्वात जास्त ८९ आमदार असून नितीश कुमार यांच्या संयुक्त जनता दलाचे ८५ आमदार निवडून आले आहेत. चिराग पासवान यांच्या लोक जनशक्ती पार्टी रामविलासचे १९, हिंदुस्तानी आवाम मोर्चाचे ५ आणि राष्ट्रीय लोक मोर्चाचे ४ उमेदवार निवडून आले आहेत.

संयुक्त जनाता दलाचे आमदार आज पाटणा इथं होणाऱ्या बैठकीत विधिमंडळ पक्षाचा नेता निवडतील. भाजपदेखील आजच नेता निवडणार असून त्यानंतर रालोआची एकत्रित बैठक होईल. २० नोव्हेंबरला नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी पाटण्यातल्या गांधी मैदानावर होणार आहे.

<><><><>

सौदी अरेबियामधल्या मक्का शहरातून मदिनाकडे जाणारी प्रवासी बस डिझेल टँकरवर धडकल्यानं झालेल्या अपघातात उमरा यात्रेसाठी गेलेल्या किमान ४० भारतीयांचा मृत्यू झाल्याची भीती व्यक्त केली जात आहे. मृतांमध्ये महिला आणि बालकांचाही समावेश आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या अपघाताबद्दल खेद व्यक्त केला असून मृतांच्या कुटूंबियांप्रति शोकभावना व्यक्त केली आहे. या दुर्घटनेत जखमी झालेल्याना लवकर बरं वाटावं अशी कामना त्यांनी केली आहे. भारतीय अधिकारी सौदी अरेबिया प्रशासनाच्या निरंतर संपर्कात असल्याचं प्रधानमंत्र्यांनी समाज मध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

परराष्ट्र व्यवहार मंत्री एस जयशंकर यांनी समाज मध्यमावरच्या संदेशात या अपघातातल्या जीवितहानीबद्दल शोक व्यक्त केला आहे. जेद्दाहमधल्या वाणिज्य दूतावासानं अपघातग्रस्तांच्या नातेवाईकांना माहिती देण्यासाठी नियंत्रण कक्ष सुरु केला आहे. अपघातग्रस्तांबाबत माहिती मिळवण्यासाठी **8002440003 किंवा 0122614093, किंवा 0126614276 तसंच  0556122301** या क्रमांकावरून नियंत्रण कक्षाशी संपर्क साधता येईल.

तेलंगणाचे मुख्यमंत्री ए रेवन्त रेड्डी यांनीही या दुर्घटनेबद्दल शोक व्यक्त केला आहे. प्राथमिक माहितीनुसार या बसमधले बहुसंख्य प्रवासी हैदराबादचे रहिवासी असल्याचं रेड्डी यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे. दरम्यान, रेड्डी यांनी राज्याचे मुख्य सचिव आणि पोलीस महानिरीक्षक यांना या बसमधल्या प्रवाशांची माहिती गोळा करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

**<><><><><>**

तामिळनाडूमध्ये कोइम्बतूर इथं दक्षिण भारतीय जैविक कृषी महासंघातर्फे १९, २० आणि २१ नोव्हेंबरला मेळावा होणार आहे. यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सहभागी होणार आहेत.  ते ५० कृषी शास्त्रज्ञांशी चर्चा करतील असं शेतकरी संघटनांचे समन्वयक पी आर पांडियन यांनी सांगितलं. या मेळाव्यात तामिळनाडू, केरळ, कर्नाटक, आंध्रप्रदेश, तेलंगणा, पद्दुचेरीसह इतर राज्यांमधून पाच हजारापेक्षा जास्त शेतकरी सहभागी होणार आहेत.

**<><><><><>**

भारत-न्यूझीलंड मुक्त व्यापार कराराबात चर्चा करण्यासाठी न्यूझीलंडचे व्यापार आणि गुंतवणूक मंत्री टॉड मॅकक्ले यांचं आज मुंबईत आगमन झालं. केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयुष गोयल यांच्या न्यूझीलंड दौऱ्यानंतरच्या टप्प्यातली चर्चा मॅक्कले यांच्या या दौऱ्यात होईल.

**<><><><><>**

सार्वजनिक क्षेत्रातल्या तेल कंपन्यांनी अमेरिकेबरोबरच पहिल्यांदाच LPG आयातीसाठी करार केला आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्री हरदीपसिंह पुरी यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा करार एक वर्षासाठी लागू असेल. नागरिकांना किफायतशीर दरात LPG उपलब्ध करून देण्यासाठी आणि पुरवठा व्यवस्थेत विविधता आणण्यासाठी सरकारकडून हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे.

**<><><><><>**

प्रसारमाध्यमांनी लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून देशाच्या बांधणीत योगदान द्यावं असं आवाहन उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी केलं आहे.

**<><><><><>**

आज आणि उद्या मध्य महाराष्ट्र, विदर्भासह छत्तीसगड, राजस्थान आणि मध्य प्रदेशात तुरळक ठिकाणी थंडीची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. तर तमिळनाडू, पुदुच्चेरी, कराईकल, आंध्र प्रदेश, केरळ आणि माहेमध्ये तुरळक ठिकाणी जोरदार पावसाचा अंदाज आहे.

**//<><><><><>//**